## निशाणी क्र.६४ वरील आदेश

१. वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी नं.१ यांचे समन्स डकवुन बजावणी करीता तसेच समन्स जाहीर पेपर नोटीसद्वारे प्रसिध्द करणेबाबत दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या कथनानुसार प्रतिवादी नं.१ यांना कोर्टामार्फत समन्स काढण्यात आले आहेत. सदर प्रतिवादी नं.१ हे दावा मिळकतीबाबत या मे. कोर्टाच्या स्थळसिमेत येऊन खरेदीखत अस्तित्वात आणले आहे. सदरचे खरेदीखत नि.३५ चे फेरिस्तसोबत दाखल केलेले आहे. सदर खरेदीपत्रामध्ये प्रतिवादी नं.१ यांचे आधारकार्ड जोडले आहे.

३. प्रतिवादी नं.१ याच्या सोमय्यापलायम कोईम्बतुर, तामिळनाडु या पत्यावरसुध्दा आर.पी.ए.डी. ने नोटीस काढली आहे परंतु ती बजावली नाही. सदर आधार कार्ड व खरेदीपत्र यावरुन असे सिध्द होते की, प्रतिवादी नं.१ हा जाणुनबुजून समन्स बजावुन घेण्यास टाळाटाळ करत आहे व त्याच्या बेकायदेशीर हालचाली चालु आहेत त्यामुळे सदरचा अर्ज देणे भाग पडले. वादीने प्रतिवादी नं.१ विरुध्द त्याच्या दिलेल्या पत्यावर समन्स डकवुन बजावणीचा आदेश व पेपरमध्ये जाहीर समन्स प्रसिध्द करणेकरीताची विनंती केली.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. प्रतिवादी नं.१ विरुध्द कोर्टामार्फत समन्स काढण्यात आले होते. परंतु प्रतिवादी नं.१ हा केरळ येथे राहत असल्याबाबतचा रिपोर्ट बेलिफ यांनी दिलेला आहे. प्रतिवादी नं.१ यास कोईम्बतुर येथील पत्यावर नोंदणीकृत डाकेनेसुध्दा समन्स काढण्यात आले होते. परंतु सदरचे समन्स हे बजावणी न होता परत आलेले आहे. वादी यांनी नि.३५ कडे प्रतिवादी नं.१ ने करुन दिलेल्या दस्ताची प्रत हजर केलेली आहे. यावरुन प्रतिवादी नं.१ हा जाणुनबुजून समन्सची बजावणी करुन घेण्यास टाळाटाळ करत आहे असे दिसुन येते.

४. ज्यावेळी प्रतिवादी  हा आढळुन येत नाही किंवा तो दाव्याचे समन्स

अथवा नोटीस बजावुन घेण्यास टाळाटाळ करत आहे असे निदर्शनास आल्यास त्याचेविरुध्द तो शेवटी राहत असलेल्या पत्त्यावरील घराच्या दर्शनी भागावर समन्स डकवुन बजावणी करता येते. तसेच समन्स हे त्या भागात मोठ्या संख्येने प्रसारित होणा-या दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करुन त्याची बजावणी करता येऊ शकते. सदर अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रतिवादी नं.१ हे दाव्याचे समन्स घेण्याचे टाळाटाळ करत आहे असे दिसुन येते. सबब वादीचा सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो. सबब खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी नं.१ यास दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ५ नियम २० नुसार मागणी केलेल्या पत्यावर घराच्या दर्शनी भागावर समन्सची डकवुन बजावणी करण्याकरीता समन्स काढण्यात यावे. तसेच सदर परिसरात मोठ्या प्रमाणात प्रसारित होणा-या दैनिक वृत्तपत्रात सदर समन्स प्रकाशित करण्यात यावे.

३. जाहीर प्रकटनाचा खर्च वादींनी सोसावा.

Sd/-

आटपाडी.                    **( अनंत रा. टेंगसे )**

दिनांक- १६/१२/२०२३.                    सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर., आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. A. Jamadar
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 16.12.2023
Order signed by the
Presiding Officer on - 16.12.2023
Order uploaded on - 16.12.2023